करतात. पण ज्ञानेश्वरींत गीतार्थ विशद करतांना अज्ञान ग्राह्य मानतात. (११२०) ज्ञानराजांनीं गीतेचें सार म्हणून आपला अखेरचा शब्द आपल्या महासिद्धांतांत पुढच्याच ओवींत दिला आहे. 'एथ अविद्या नाशु हें स्थळ । तेणें मोक्षोपादान फळ । या दोहीं केवळ । साधन ज्ञान ॥ १२४३ ॥ हें उपनिषदांचें सार आहे. जे उपनिषदांचें सार । श्रीकृष्णार्जुनीं बरवी । गोठी जे केली ॥ १८०६ ॥

## प्रेमलक्षणा भक्ति

ज्ञानेश्वर अद्वैती ज्ञानमार्गी होते हें जरी खरें तरी त्यांची ज्ञानेश्वरी ज्ञान व भक्ति हीं आरंभीं सहकारी आहेत असें मानते. ही भक्ति ज्ञाननिष्ठा कीं प्रेमलक्षणा असा एक वाद श्री. साईलीला त्रैमासिकाच्या जुलै-सप्टेंबर १९५४ च्या अंकांत उत्पन्न केला आहे. श्री. त्रिलोकेकर म्हणतात, ज्ञानेश्वरींत शंकराचार्यांप्रमाणें ज्ञाननिष्ठा आहे. श्रीकृष्णच सांगतात, 'ज्ञानी हा माझा आत्मा आहे.' मी म्हणतों, ज्ञानेश्वरींत प्रेमाचीं आणि ज्ञानाचीं दोन्ही लक्षणें आहेत. 'चरणरज' ज्ञानेश्वरींतील भक्ति प्रेमलक्षणा आहे असें म्हणतात, त्या अर्थीं प्रेम आणि भक्तींत ते अंतर मानतात, ही गोष्ट सिद्ध आहे. दोहोंत सूक्ष्म भेद आहे. पण ही भेदरेषा ओळखणें मात्र कठीण आहे. श्रीपांडुरंगावर तुकाराममहाराजांची भक्ति कीं प्रेम? भक्ति सहेतुक असते, तर प्रेम स्वार्थनिरपेक्ष असतें. आईचें मुलावरील प्रेम निरपेक्ष असतें, पण ज्यावेळीं आपण पितृभक्ति, ईश्वरभक्ति म्हणतों त्यावेळीं ती भक्ति सहेतुक असते. त्यांत पित्यानें तसेंच ईश्वरानें केलेल्या उपकाराची जाणीव असते. आईचें मुलावर प्रेम असतें. मुलाची आईवर भक्ति असते. अनन्यभक्तीचें रूपांतर प्रेमांत होईल. शंकराचार्यांप्रमाणें उपासना म्हणजे ज्ञानसंपादन करण्याचें साधन. भगवद्भक्त कामत आपल्या ज्ञानेश्वर-हृदयांत म्हणतात,

ज्ञानपूर्वीच प्रेमासी । उपासना नांव तयासी ।
ज्ञानयुक्त प्रेमासी । भक्ति हें नांव ॥
ज्ञान तेंचि भक्ति । संतसंगति प्रेमोत्पत्ति ॥
ज्ञानोत्तर अनन्यतेसी । भक्ति म्हणों ॥

ज्ञान तेंचि भक्ति म्हटल्यावर ज्ञानोत्तर भक्ति कीं भक्त्युत्तर ज्ञान हा शुष्क वाद उरतच नाहीं. या ज्ञानभक्ति सहज । भक्त एकवटला मज । तो मीचि केवळ तुज । श्रुतही आहे ॥ ११३० ॥ या ज्ञानभक्तीच्या योगानें भक्त माझ्याशीं ऐक्य पावतो. द्वैती भक्त परमेश्वरांत विलीन होतो हें मानण्यास तयार नाहींत. भक्तीपासून होणाऱ्या शाश्वत परमानंदाची प्राप्ति हेंच त्यांचें ध्येय. हा आनंद अखंड राहावा म्हणून ते 'कैवल्यासही परौते सर' असें म्हणतात. तुकाराममहाराज म्हणतात, 'न लगे मुक्ति धन संपदा ।' त्यांना गर्भवासाची परवा नसते. 'तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥' चारी पुरुषार्थांपेक्षांही ते भक्तीला जास्त महत्त्व देतात. १८-८६७. ज्ञानेश्वरींतील प्रेमाची कल्पना

थोडीशी निराळी आहे. 'आत्मस्वरूपची प्रेम। त्यासि ईश्वर हें नाम।' ईश्वर ही अगम्य वस्तु सर्वांभूतीं नसून भगवद्भाव म्हणजेच ईश्वर. तेव्हां प्रेमस्वरूपी भक्ति ज्ञानेश्वरींत नाहीं असें कोण म्हणेल? ज्ञानी हा ईश्वराचा भक्त नाहीं तर कोण? ज्ञानेशांची ज्ञाननिष्ठा प्रेमभक्तिरहित नाहीं. पण ज्ञानानंतर प्रेमभक्तीची गरजच उरत नाहीं. ज्ञान झाल्याबरोबर ज्ञान्याला ब्रह्मसाक्षात्कार होतो, तो ब्रह्मांत विलीन होतो, तो मुक्त होतो. भक्ति म्हटली म्हणजे तिला देव आणि भक्त अशी जोडगोळी पाहिजे. ज्ञानेशांच्या हृदयांत आत्मप्रेमनिष्ठा होती; पण ती श्रीकृष्णप्रेमनिष्ठा होती कीं श्रीविठ्ठलप्रेमनिष्ठा होती याबद्दल वाद आहेत. ज्ञानेश्वरींत श्रीविठ्ठलाचा उल्लेख नाहीं, तेव्हां दुसरा प्रश्न आपोआपच सुटतो. श्रीकृष्णप्रेमाबद्दल अनेक उल्लेख असले तरी ते परमात्म्याला उद्देशून आहेत. ज्ञानेश्वर परमेश्वराबद्दल स्वतंत्र विचार मांडतात तेव्हां त्यांना परमेश्वराचे ठिकाणीं आत्मा अभिप्रेत असतो. त्यांची नमनाची पहिली ओवी पहाः—

ॐनमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥

त्याच्याच पुढें दिलेलें सगुण साकार श्रीगणपतीचें इतकें सुंदर वर्णन ललित वाङ्मयांत क्वचितच आढळेल. पण तें गणपतीचें सुंदर रूप 'मियां नमिलें श्रीगुरूकृपा। आदिबीज।' आदिबीज ॐकारस्वरूप म्हणून मी त्याला नमस्कार करतों. केवळ भक्तीला वाहिलेला जो नववा अध्याय त्यांत नामस्मरणाचा महिमा गायिला आहे. 'कृष्ण, विष्णु, हरि, गोविंद' नामांचा घोष चालला आहे. पण त्यांतही आत्मचर्चा विशद। उदंड गाती। सद्‌गुरूवांचून ज्ञान नाहीं, असें ज्ञानमार्गी आचार्यांचें मत आहे. भक्तिप्रधान बाराव्या अध्यायांत गुरुकृपेला नमन केलें आहे; पण त्या नमनांत योगप्रक्रियेचें माहात्म्य वर्णिलें आहे. ज्ञानेश्वरांना भक्तियोगाचें साध्य जो भक्तिरसास्वादाचा आनंद त्याची गोडी माहित होती. या भक्तिजन्य आनंदप्राप्तीचें साधन जी नवविधा भक्ति त्या भक्तीचें रसाळ वर्णन तेराव्या अध्यायांत ज्ञानेशांनीं जवळ जवळ शंभर ओव्यांत केलें आहे. प्रेमलक्षणा भक्तीचेंही वर्णन जागोजाग आलें आहे. सद्‌गुरुकृपा संपादन करण्यासाठीं शिष्याची मजल किती जाते त्याबद्दल ते सांगतातः—गुरु हे आपले पति आहेत, असें समजून तो त्यांचा उपभोग घेतो. पाय रगडणारीं जी लक्ष्मी तीं आपणच होतो. १३: ३१९—३९४. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील.

## भक्तीचें अनेकार्थत्व

ज्ञानेश्वरींत ज्ञानभक्ति, अद्वैतभक्ति हे शब्द मधूनमधून आढळतात. वास्तविक ज्ञान आणि भक्ति, अद्वैत आणि भक्ति हे शब्द परस्परविरोधी आहेत. गीतेंत ज्ञान, कर्म, ब्रह्म, भक्ति हे शब्द वेगवेगळया अर्थी वापरलेले आहेत. ब्रह्म हा शब्द वेद, माया, प्रकृति, परमात्मा या अर्थानें योजिलेला आहे. भक्ति या शब्दाचा अर्थ त्या त्या स्थळीं असलेल्या संदर्भावरून लावावा लागतो. उदाहरणार्थ, भक्ति म्हणजे एखाद्या वस्तूबद्दल उत्कट भावना, सात्विक आसक्ति. ज्ञानभक्ति म्हणजे ज्ञानावर आसक्ति. अद्वैतभक्ति =

अद्वैतावरील आसक्ति. ध्यानात्मक एकाग्रता असाहि अर्थ केव्हां केव्हां घ्यावा लागतो. ज्यावेळीं ज्ञानेश्वर अद्वैतीं भक्ति असा शब्दप्रयोग करतात त्यावेळीं त्याचा अर्थ ब्रह्माच्या ठिकाणीं ध्यान, धारणा, एकाग्रता असा करावा लागेल. भक्तीचा पारिभाषिक अर्थ घेऊन चालणार नाहीं. गीतेंत मूर्तिपूजेचा उल्लेख नाहीं. 'पत्रं पुष्पं फलं तोयं...हा एकच श्लोक मूर्तिपूजेचा निदर्शक आहे. पण ब्राह्मणकालांतही यज्ञांत इंद्रवरुणांना आहुति देण्याचा प्रघात होताच कीं! बौद्धांचें अनुकरण म्हणून शिव-विष्णूंचीं देवळें व मूर्ति नुकतींच अस्तित्वांत येऊं लागलीं होतीं. मूर्तींच्या अद्भूत कल्पना श्रुति, स्मृति, महाभारत किंवा भगवद्गीता यांत दिसून येत नाहींत. पुराणकालांत त्या पराकोटीला गेल्या. गीतेच्या कालांत ध्यान-धारणेकरितां मूर्तींचा उपयोग होत असावा.

## भक्ति व ज्ञान यांचा समन्वय

ज्ञानी इयेतें स्वसंवित्ति। शैव म्हणती शक्ति। आम्ही परम भक्ति। आपुली म्हणो ॥ ही परम भक्ति म्हणजे ज्ञानभक्ति होय. ज्ञानेशांनीं जय जय स्वसंवेद्या म्हणून पहिल्याच श्लोकांत निर्गुणब्रह्म आत्मस्वरूपास नमस्कार केला आहे. 'मीचा मला लाभ होणें' यालाच ज्ञानशक्ति म्हणतात. 'प्रेमानें मला समजणाऱ्याला मी प्रथम बुद्धियोग (ज्ञान-योग) देतों(१०:१००) कीं जेणेंकरून ते मला प्राप्त होतात.' भक्तिमार्ग आणि समाधि या दोहोंतही चित्ताची एकाग्रता साधावी लागते. भक्तिमार्गानें ईशप्राप्ति सुलभ होईल. पण ज्ञानेश्वरींतील भक्ति अद्वैतपंथाची आहे. नामदेव किंवा वल्लभाचार्यांची द्वैती विचार-प्रणाली गीतेंत नाहीं. भक्ति द्वैतपणासी लाजे। तीस पाहिजे आत्मैक्य सहजें ॥ मी आणि परमेश्वर ही द्वैताची कल्पना जोंपर्यंत मनांत आहे तोंपर्यंत ती भक्ति पूर्णा-वस्थेला पोहोंचली असें म्हणतां येणार नाहीं. ज्ञान व भक्ति हीं खरोखरच परस्परांना उपकारक आहेत.

भक्तिप्रेमाविण ज्ञान असार। ज्ञानाविण भक्ति व्यर्थ ॥
आत्मज्ञानाविण भक्ति न कळे। भक्तिज्ञानाविण ज्ञान दुबळें ॥
दोन्ही मिळणीं सुखसोहळे। जीवन्मुक्तीचे ॥

म्हणूनच ज्ञानेश्वर ज्ञानयोगालाच भक्तियोग म्हणतात. 'मीच वृत्तिज्ञानद्वारें दिसतों. तेंच द्रष्टत्व नाहींसें झालें म्हणजे माझा मीच मला प्राप्त होतों. हा भक्तियोग दृश्यमार्गाहून भिन्न आहे म्हणून मी याला चौथा भक्तियोग म्हणतों (११२९)' आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी यांच्या अपेक्षेनें ही चौथी भक्ति (१११३) आणि ही चौथी भक्ति म्हणजेच सातव्या अध्यायांतील ज्ञान्याची होय. "आर्तो जिज्ञासु अर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ" ॥ ७ ॥

भक्तिमार्गाची परिणति प्रथम ज्ञानांत व शेवटीं सायुज्यतेंत होते, हें गीतेचें सार-हा महासिद्धांत-गीताकारांस तसेंच ज्ञानेशांस मांडावयाचा आहे. ज्ञानाशिवाय

मोक्ष नाहीं. कर्म, भक्ति, योग या सर्व साधनांची परिणति ज्ञानांतच होते. ज्ञानेश्वरांना ज्ञानोत्तर भक्ति मान्य आहे. पण या भक्तीनंतर भक्ताला शुद्ध ज्ञान प्राप्त होऊन त्याला अद्वयानंद–सुखाचा लाभ होतो व तो परमात्म्यांत लीन होतो, असें त्यांचें मत आहे. या शुद्ध ज्ञानालाच ते स्वसंविचि, शक्ति किंवा परमभक्ति म्हणतात. सहज-स्थिति, सहज प्रकाश, चौथी भक्ति हीं सगळीं शुद्ध ज्ञानाचींच नांवें आहेत.

## भक्तीच्या उत्तरोत्तर अवस्था

भक्तीच्या उत्तरोत्तर अवस्थांचें निरूपण ग्रंथाचे अखेर केलें आहे. 'चित्त मद्रूप होतें, तेव्हांच भक्त माझ्या स्वरूपांत मिळतो. एका दिव्यानें दुसरा दिवा लावला असतां पहिला कोणता हें ओळखतां येत नाहीं.' ही स्थिति प्राप्त होण्याला प्रथम भक्तानें विवेक आणि वैराग्य यांच्या साहाय्यानें नैष्कर्म्य–सिद्धि प्राप्त करून घेतली पाहिजे. ज्ञानेश्वरांच्या मतें गीता ५५ व्या श्लोकाचे अखेरीस संपते. पुढचा भाग केवळ अनुवादाकरितां आहे. म्हणून मागील सर्व सिद्धांतांची एकवाक्यता करून ते व गीताकार ४९–५५ श्लोकांत महासिद्धांत मांडतात. ज्यानें अंतःकरण जिंकलें आहे, ज्याची देहावरील आसक्ति नाहींशी झाली आहे, ज्याच्या अज्ञानाचा नाश झाला आहे, त्याला नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त होते, तो निष्क्रिय ज्ञानमात्र उरतो. नंतर तो शब्दादि विषयांचा, तसेंच रागद्वेषाचा परित्याग करून, ध्यान व योग यांत निमग्न असलेला वैराग्याचा आश्रय करतो. या अवस्थेनंतर तो ममत्वरहित, अतिशय शान्त असा ब्रह्म बनण्यास समर्थः होतो (ब्रह्मभूयाय कल्पते). या पलीकडे ब्रह्मकल्प झालेला शांतचित्त भक्त प्राणि-मात्रांचे ठिकाणीं समत्व ठेवणारा, माझ्या पराभक्तीला, सहजस्थितीला, सहज-प्रकाशाला येऊन मिळतो. आणि यानंतर मी केवढा आहें, मी कसा आहें, तें यथार्थ-पणें आपल्या भक्तीच्या बलानें जाणून घेतो. आणि त्यानंतरच्या अंतिम अवस्थेंत त्याला माझें संपूर्णतया ज्ञान झाल्यामुळें तो माझ्यामध्यें प्रवेश करतो, तो ब्रह्म होतो. ज्ञानेश्वर म्हणतात, राजेपणा आलेवरच राजेपणाचें सुख कळतें. जो स्वतः आकाश झाला नाहीं त्याला आकाशाची व्याप्ति कशी समजेल? ब्रह्माचा आनंद भोगण्यास आपण ब्रह्मच झालें पाहिजे. झालें. येथें गीता संपली. ज्ञानेश्वरींही संपत आली. मग आपण यास ज्ञानयोग म्हणा, भक्तियोग म्हणा कीं प्रेमलक्षणा भक्ति म्हणा!

# महानुभाव पंथाचे संस्थापक

# श्री च क्र ध र

## यांच्या कांहीं उद्‌बोधक आणि अद्‌भुत कथा

महानुभव पंथाचे आद्य संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांच्या लोकविलक्षण चरित्राविषयीं सर्वसामान्य मराठी वाचकाला फारच थोडी माहिती असते. वस्तुतः श्रीचक्रधरांचें महाराष्ट्रावर फार मोठें ऋण आहे. श्रीचक्रधरांचें अवतारकार्य सांगणारा 'लीळाचरित्र' हा ग्रंथ म्हणजे मराठींतील आद्य गद्य ग्रंथ होय. श्रीचक्रधर हे जन्मानें गुजराती, परंतु त्यांचें सर्व कर्तृत्व महाराष्ट्रांत झालें. महाराष्ट्राविषयीं त्यांनीं नितांत आदर व्यक्त केलेला आहे. गीर्वाण भाषेतील तत्त्वज्ञान त्यांनीं आपल्या शिष्यांना मराठींतून सांगितलें. त्यांच्या अंतिम प्रयाणानंतर त्यांचीं वचनें जशींच्या तशीं मराठींतून लिहून ठेवण्यांत आलीं. त्यामुळें महानुभावांच्या दृष्टीनें मराठी ही त्यांची धर्मभाषा बनली होती. चक्रधरांचे शिष्य नागदेवाचार्य यांनीं आपल्या सर्व शिष्यांना मराठींतच ग्रंथरचना करण्याचा आदेश दिला होता. त्यामुळें अनेक गद्य-पद्य-ग्रंथ महानुभावांनीं मराठींत तयार केले आहेत.

श्रीचक्रधरस्वामी हे प्रत्यक्ष ईश्वरावतार आहेत अशी महानुभावांची श्रद्धा आहे. 'आहेत' असें म्हणण्याचें कारण हें कीं, श्रीचक्रधर अद्यापि हिमालयांत विद्यमान आहेत अशी महानुभावांची समजूत आहे. श्रीचक्रधरस्वामींचें जीवनचरित्र अत्यंत अद्‌भुत आणि उद्‌बोधक आहे. त्यांच्या चरित्रांत दिसून येणाऱ्या त्यांच्या अहिंसा-प्रेमाच्या कांहीं गोष्टी इथें दिल्या आहेत. तसेंच भूतमात्रावर त्यांचें कसें प्रेम होतें हें दर्शविणारे व इतरहि कांहीं लोकविलक्षण असे त्यांच्याचरित्रांतील प्रसंग इथें दिले आहेत.

× × ×

एकदां स्वामींच्या दर्शनासाठीं एक स्त्री आलेली असतांना स्वामी घाईघाईनें मठांतून बाहेर आले. बाहेर पडतांना भान न राहून मठाच्या ठेंगण्या दरवाजाच्यावर त्यांचें डोकें आपटलें. हें पाहून त्यांची एक शिष्या बाइसा हिला वाईट वाटलें आणि दर्शनार्थ आलेल्या त्या स्त्रीचा तिला राग आला. तिच्यासाठीं स्वामी बाहेर येत असतां त्यांना इजा झाली, म्हणून बाइसा संतापून त्या स्त्रीला उद्देशून म्हणाली—'हे काइ वो जाले या रांडासीः बाबाचा मुकुट्ट दुखविलाः' तेव्हां स्वामी बाइसाला म्हणाले, 'बाई ! या स्त्रीला व्यर्थ शिव्या कां देतां ? त्यामुळें तिचें अंतःकरण किती दुखावेल याचा कांहीं विचार करा—'प्राणिये एथ आलेया जळता जावे तरी निवावे कोठें ?'—आमच्याकडे जे जीव येतात त्यांनाहि दुखावलेल्या अंतःकरणानें येथून जावें लागलें तर त्यांना समाधानाची जागा दुसरीकडे कुठें मिळणार ?'

एकदां कांहीं बैराग्यांबरोबर स्वामी किष्किंध पर्वताकडे निघाले होते. वाटेवर एका गांवांत भिक्षा मागायला या बैराग्यांपैकीं एकजण गेला असतां, एका बाईनें त्याच्या हातावर कढतकढत आंबील घातली. त्यामुळें त्याचा हात पोळून निघाला. त्याचा सूड घेण्यासाठीं त्या बैराग्यानें आंबील चाटून झाल्यावर संतापानें आपला हात त्या बाईच्या घराच्या वळचणीला पुसला. त्या तपस्वी बैराग्याचा पोळलेला हात वळचणीला लागतांच वळचणीनें पेट घेतला ! तें घर जळालें व त्या

घराच्या आगीनें गांवांतील इतर घरें पेटून एकच आगडोंब उसळला. हा प्रकार त्या बैराग्यानें मोठ्या प्रौढीनें स्वामींच्या कानावर घातला. तेव्हां अत्यंत दुःख होऊन स्वामी त्या बैराग्याला म्हणाले, 'महात्मे हो, वोखटें केलें : ऐसेनी भूतहिंसा केली : परि कैसीहि काही घृणा नुपजैचि होए : आता हे तुम्हां सांघाते न ये :' असें म्हणून त्या बैराग्यांबरोबर पुढें जाण्याचें त्यांनीं साफ नाकारलें व ते तेथून दुसरीकडे निघून गेले.

'हिंसा वर्ते तिये स्थानीं महात्मेया असों नये' असा उपदेश स्वामींनीं केला आहे. आपल्या शिष्यांकडून क्षुद्र जीवजंतूंनाहि पीडा होऊं नये याबद्दल ते नेहमीं जपत. एकदां आपल्या शिष्यांकडून ते एक गुंफा तयार करवीत होते. एक खड्डा खणून मातीचा गारा तयार करण्यांत आला. दुसऱ्या दिवशीं येऊन पाहातात तों त्या गाऱ्यावर सगळीकडे मुंग्याच मुंग्या पसरल्या होत्या. स्वामींनीं तें पाहतांच शिष्यांना त्यांनीं सांगितलें, 'तें स्थान सांडाः आणिकी गारि कराः एथचि सेवा तें भूता अविरोधें करावी की गाः' आपली सेवा होतांना कोणाहि प्राण्याला व जीवजंतूंना उपद्रव होऊं नये ही स्वामींची मनापासूनची इच्छा असे.

एकदा मठांत एक इंगळी निघाली. स्वामींची शिष्या आउसा हिनें ती मारली व बाहेर फेंकून देण्यासाठीं ती घेऊन निघाली. स्वामींनीं हें पाहिलें तेव्हां विचारलें, 'हे वींगुळि कां मारिली ?'

आउसा म्हणाली, 'ही कोणा प्राण्याला चावली असती तर ?'

स्वामी त्यावर म्हणाले, 'इंगळी हाहि एक प्राणीच नव्हे का ?' ते पुढें म्हणाले, 'तुम्हीं महात्मे कीः सर्वां भूता अभए देयावी कीः'

ज्या महात्म्यांनीं सर्व भूतांना अभय द्यायचें त्यांनीं स्वतःच प्राणिहिंसा करणें अनुचित, असें स्वामींचें मत होतें. मठांत विंचू वगैरे निघाला तर त्याला न मारतां वस्त्रांत धरून तो बाहेर नेऊन टाकण्यास स्वामी सांगत असत. मठांत एकदोनदां साप निघाले होते. तेंहि न मारतां त्यांनीं बाहेर घालविले.

एक दिवशीं मठांत एक कुत्रें शिरलें. त्यानें स्वामींचा एक शिष्य भटोबासा याची भिक्षेची झोळी पळविली. दुसऱ्या दिवशीं तें कुत्रें पुन्हां मठाकडे आलें. त्याला पाहतांच आउसानें त्या कुत्र्यावर नेम धरून एक दगड भिरकावला. दगड लागतांच कुत्रें केंकाटूं लागलें. तो आवाज स्वामींच्या कानावर पडला आणि जणूं आपल्या देहाला वेदना होत असल्यासारख्या दुःखावेगांत त्यांनीं आपलें डोकें दोन्हीं हातांनीं दाबून धरलें. कुत्रें दूर गेल्यावर स्वामी आउसाला म्हणाले, 'त्या कुत्र्यावर कां दगड मारलास तूं ?' आउसा म्हणाली, 'काल त्यानें भिक्षेची झोळी पळवून नेली होती. आज पुन्हां तें आलें म्हणून त्याला घालविण्यासाठीं मीं दगड भिरकावला.' स्वामी म्हणाले, 'या कुत्र्याला कोणी आईबहीण आहे का, कीं जी त्याच्यासाठीं जेवण रांधून ठेवील ? आणि मग हें कुत्रें घरीं जाऊन जेवण करील ? त्याला कुठूनतरी अन्न मिळायला तर हवें. त्यासाठीं तें तुमच्याकडे आलें. त्याला अन्न द्या तरी, किंवा द्यायचें नसलें तर आपल्या अन्नाचा तुम्ही नीट संभाळ करा. पण त्याला बिचाऱ्याला मारतां कां ?'

एकदां स्वामी एकटे भ्रमण करीत असतां एका रानांत झाडाखालीं बसले होते. त्याच रानांत कांहीं पारधी पैज लावून सशाची शिकार करीत होते. एका सशामागें त्यांनीं कुत्रीं सोडलीं होतीं व तो बिचारा ससा धूम पळत सुटला होता. पळतां पळतां तो स्वामींकडे आला आणि स्वामींची दयार्द्र नजर पाहून विश्वासानें तो त्यांच्या मांडीखालीं लपून बसला. मागोमाग ते पारधीहि तेथें येऊन पोंचले. स्वामींचा आश्रय घेतलेला तो ससा त्यांच्या नजरेस पडला व स्वामींकडे तो ते मागूं लागले. स्वामी म्हणाले, 'हा ससा मला शरण आला आहे. त्याला मी तुमच्या स्वाधीन कसा करूं?'

पारधी म्हणाले, 'पण महाराज हा आमच्या होडेचा ससा आहे. याला मारण्यासाठीं आमच्यामध्यें पैज लागली आहे. तेव्हां तुम्ही तो आमच्याकडे परत करा.' स्वामी म्हणाले, 'जो मला शरण आला त्याला मी मरण देणें हें योग्य होईल का? तो बिचारा निरुपद्रवी प्राणी कोणाला इजा देत नाहीं, उपद्रव करीत नाहीं. याला तुम्हीं तरी मारणें योग्य आहे का?' स्वामींच्या कोमल शब्दांनीं पारधी शरमले आणि स्वामींची क्षमा मागून तेथून निघून गेले. ते गेल्यावर मांडी उचलून स्वामी सशाला म्हणाले, 'महात्मे होः आता जाएः' आणि मग निश्चिंत होऊन तो ससा निघून गेला.

महात्म्यांनीं ठोशाला ठोसा अशी वृत्ति न धरतां संपूर्ण अहिंसक व क्षमाशील वृत्ति धारण करूनच राहिलें पाहिजे असें स्वामींचें सांगणें होतें. आउसाला उपदेश करतांना श्रीचक्रधर म्हणाले होते– 'एथौनि तुम्ही ऐसेया होआवे कीं हा जनु तुमनें डोइए डोइए मारील : परि तुम्ही डोईची वोडवावी.–' लोकांनीं आपल्या मस्तकावर प्रहार केले तरी प्रतिप्रहार न करतां तुम्हीं त्यांच्यासमोर आपलें मस्तक नम्र केलें पाहिजे.

या उपदेशाला अनुरूप असेंच श्रीचक्रधरांचें स्वतःचें वर्तन होतें. त्यांचें माहात्म्य वाढूं लागल्यामुळें अनेक पंडित व संन्याशी यांचें प्रस्थ कमी होऊं लागलें होतें. त्यामुळें चक्रधरांविषयीं अनेकांचा राग वाढत चालला होता. यादवांचा पुरोहित महदाश्रम यानें स्वामींवर एकदां विषप्रयोगाचा प्रयत्न केला. एकदां त्यांची पूजा करण्याच्या निमित्तानें त्यांना बोलवून त्यांना गर्तेंत पाडण्याचा त्याचा डाव होता. हे दोन्ही प्रयत्न विफल ठरल्यानें तो स्वामींवर सदैव जळफळत होताच. हेमाडपंताचाहि स्वामींवर राग होता.

एके दिवशीं सकाळीं मठाच्या आवारांत स्वामी आसनावर बसले होते. भोवतालीं अनेक भक्तजन गोळा झालेले होते. स्वामी इतक्यांत म्हणाले, 'मुनिए आले गा!' हे 'मुनी' कोण म्हणून लोक पाहतात तों त्यांना सशस्त्र सैनिक आलेले दिसले. हेमाडपंतांचे पाईक मठांत आले. त्यांनीं गुंफेची लुटालूट चालविली. स्वामींचे शिष्य नागदेवाचार्य यांनीं एका सैनिकाचीच ढाल तलवार हिसकून घेतली व ते सैनिकांशीं आवेशानें लढूं लागले. स्वामी मोठ्यानें नागदेवाचार्यांना म्हणाले, 'वानरेया! हां गाः तुज करावे एथौनि करवेले? ठेविसि ना तरि एथिचि आणः–तुला मीं लढायला सांगितलें का? आधीं शस्त्र खालीं टाक. माझी शपथ आहे.'

आपली शपथ घालून त्यांनीं नागदेवाला शस्त्रत्याग करायला लावला. आलेल्या पाइकांनीं मठ लुटून नेला आणि 'हेमाडपंतांनीं आपल्याला घेऊन यायला सांगितलें आहे' असें म्हणून ते स्वामींना घेऊन पैठणला गेले.

पैठणला गेल्यावर हेमाडपंत, सारंग पंडित आदि महाजनांची देवळांत सभा भरली. श्रीचक्रधर यांचें स्त्रियांशीं वागणें अनुचित असतें, असा त्यांच्यावर आरोप ठेवण्यांत आला आणि शिक्षा म्हणून श्रीचक्रधरांचा 'अवयवछेद' करण्यांत आला—त्यांचें नाक कापण्यांत आलें !

पैठणहून स्वामी निघाल्यानंतर फिरत फिरत ते जवळगांवला आले होते. तेथेंच नागदेवाचार्य त्यांना परत भेटला. आपल्या निवासासाठीं एखादें देऊळ पाहून येण्यास स्वामींनीं नागदेवाला पाठविलें. एक देऊळ अगदीं मोडकळीस आलेलें होतें. तें पाहून नागदेव परत आल्यावर स्वामींनीं विचारलें, 'देऊळ केसें ?' महदाश्रमानें स्वामींची पूजा कशी केली होती यांचें स्मरण होऊन नागदेव म्हणाला, 'असे महदाश्रमाचिए पूजेसारखेः' स्वामींची पूजा करण्याच्या निमित्तानें महदाश्रमानें त्यांना गर्तेत लोटण्याचा कट केला होता म्हणून नागदेवानें हे उपहासाचे उद्‌गार काढले होते. पण तें स्वामींना योग्य वाटलें नाहीं. आपल्या शिष्याला अद्यापि समचित्तता प्राप्त झालेली नाहीं हें पाहून त्यांना दुःख झालें. ते नागदेवाला म्हणाले, 'तुम्ही महात्मे की गाः तुम्हां मारिता पूजिता समानाचि होआवा की गाः मुक्तीची चाड तेणें मुंगिए वीस न चिंतावेः'

ज्यानें आपल्या प्राणघाताचा यत्न केला त्याच्याहिबद्दल नुसते उपरोधाचे शब्दहि तोंडावाटे आपल्या शिष्यानें काढूं नयेत, इतकी ही वृत्तीची क्षमाशीलता खरोखरच अजोड आहे.

कांहीं दिवसांनीं आपल्या प्रिय भक्तांच्या आग्रही विनवणीला मान देऊन स्वामींनीं परत आपला देह पहिल्यासारखा केला ! विच्छेद झालेला अवयव पुन्हां आला पण स्वामींच्या शत्रूंचें समाधान झालें नव्हतें. पुन्हां कांहीं दिवसांनीं स्वामींना नेण्यासाठीं राजाकडून पालखी आली. हें बोलावणें कशासाठीं आहे हें माहित असूनहि श्रीचक्रधर त्या पालखींत बसून निघाले. राजानें चक्रधर येतांच भोयांना आज्ञा केली कीं, 'दांडी घेऊनि जाः वोखटें करा.' भोई पालखी घेऊन घाटाखालीं हातियाळे नांवाच्या तळ्याजवळ आले .त्या ठिकाणीं त्यांनीं स्वामींना उतरण्यास सांगितलें. तेथें अमरा, गांगा आणि मैळा नांवाचे तीन चांडाळ त्यांच्या बाजूला शस्त्रास्त्रें घेऊन उभे राहिले. मैळा यानें स्वामींना वधासाठीं तयार राहण्यास सांगून 'खर्ग घातलेः श्रीकमळ एकीकडे पडलेः श्रीमूर्ति धड एकीकडे पडलेः' स्वामींचें शिर धडापासून वेगळें होतांच ते चांडाळ व भोई तेथून परत गेले.

तळ्याच्या कांठावर एक नाथपंथी साधु बसले होते, त्यांनीं हा सगळा प्रकार पाहिला होता. आतां ते पाहातात तों चांडाळाच्या खड्गानें वेगळें होऊन बाजूला पडलेलें शिर हालूं लागलें ! इकडे तें धडहि हालचाल करूं लागलें ! शिर आणि धड हीं हालत एकमेकांजवळ आलीं, एकत्र झालीं ! धडाला शिर चिकटलें आणि स्वामी पूर्ववत् होऊन, उठून चालूं लागले !

नंतर श्रीचक्रधरस्वामी उत्तरेस गेले. उज्जयिनीस कांहीं काळ त्यांचें वास्तव्य झालें. उज्जयिनीहून निघून ते उत्तरपंथें हिमालयांत गेले व तेथें ते अजून 'राज्य करितात' अशी महानुभावांची श्रद्धा आहे.

# श्रीनामदेवांच्या चरित्रांतील काहीं सुरस प्रसंग

श्री नामदेवराय हे कायावाचामनानें विठोबाच्या भजनांत व चिंतनांत सदैव मग्न असत, ही गोष्ट त्यांच्या आई-बापांना आणि पत्नीला रुचत नसे. नामदेवांच्या घरांत एकूण चौदा माणसें. या सर्वांचा योगक्षेम नीट चालायचा तर नामदेवांनींहि घरसंसारांत थोडें तरी लक्ष्य घालायला हवें, असें कुटुंबांतील मंडळींना स्वाभाविकच वाटे. पण नामदेव हे विठ्ठलासाठीं संपूर्ण वेडे झाले होते. विठ्ठलाचाच एकमेव ध्यास त्यांना लागून राहिला होता. आपलें म्हणणें नामदेव ऐकत नाहीं असें पाहून मग नामदेवांच्या कुटुंबियांनीं खुद्द विठ्ठलाकडे आपल्या तक्रारी नेल्या होत्या.

नामदेवाची आई गोणाई ही विठ्ठलास उद्देशून म्हणते—

अरे विठोबा आतां पाहें मजकडे ।
कां रे केलें वेडें बाळ माझें ॥

विठ्ठलावर रागावतां रागावतां गोणाईनें त्याला अगदीं फैलावरच घेतलें ! या देवानें कधीं कुणाचें बरें केलें आहे ? जो जो देवाला संपूर्ण शरण गेला त्याचें त्याचें वाटोळेंच देवानें केलें, असें म्हणून गोणाईनें भराभर आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ अनेक उदाहरणें दिलीं. गोणाईचे हे संतापाचे उद्गार आणि त्यानंतर नामदेवाकडे प्रेमभरानें ती पाहात असतां झालेला चमत्कार यांचे मूळ नामदेवकृत अभंगच देण्याचा मोह आवरत नाहीं.

गोणाई विठोबाला म्हणते आहे—

हरी त्वां कोणाचें बरें केलें । पूर्ण आम्हां कळों आलें ॥ १ ॥
नारद वैष्णव जगजेठी । त्यांसी लाविली लंगोटी ॥ २ ॥
मयूरध्वज राजा भला । त्यासी करवतीं घातला ॥ ३ ॥
बळी दानशील भला । तुवां पाताळीं घातला ॥ ४ ॥
भीष्म वैष्णवांचा राव । त्याचा बाणें पूजिला ठाव ॥ ५ ॥
रुक्मांगद हरीचा दास । त्याचा गांवच केला वोस ॥ ६ ॥
बाळ एकुलतें एक । तें त्वां ज्ञानीच केला शुक ॥ ७ ॥
उपमन्यु बालक पाहे । क्षीरसागरीं कोंडिलें आहे ॥ ८ ॥
धुरु बाळक गोजिरवाणें । त्याचें खुंटलें येणें जाणें ॥ ९ ॥
हरिश्चंद्र तारा राणी । डोंबा घरीं वाहे पाणी ॥ १० ॥
प्रल्हाद भक्तीचा भुकेला । त्याचा बाप त्वां वधिला ॥ ११ ॥
हनुमंत भक्त निकट । त्यासी केलें तूं मर्कट ॥ १२ ॥
पुण्यवंत राजा नळ । त्याचा केला तुवां छळ ॥ १३ ॥

श्रियाळ राजा भला। त्याचा बाळ त्वां खादला ॥ १४ ॥
तुज कोणी न म्हणे भलें। बाळ पोटींचें कोवळें ॥ १५ ॥
जिकडे जिकडे तुम्ही दोघें। तिकडे तिसरा नामा मागें ॥ १६ ॥
तुज नाहीं जाती कुळ। जेऊनी भ्रष्टविलें बाळ ॥ १७ ॥
जेणें तुझें नाम घेतलें। ते संसारावेगळे केले ॥ १८ ॥
आतां जेविसी तरी तुज आण। ऐकोनि हांसे जगज्जीवन ॥ १९ ॥

गोणाईचें हें भाषण ऐकून देवाला हंसू आलें आणि त्यानें नामदेवाला गोणाईचे स्वाधीन केलें. गोणाई प्रेमभरानें नामदेवाकडे पाहूं लागली तों असा चमत्कार घडला कीं, नामदेवाच्या ठिकाणीं तिला विठ्ठलच दिसूं लागला. तेव्हां गोणाई देवाला म्हणाली, 'देवा! तुझा नामदेव मी तुलाच अर्पण करतें. तुझी काय करणी आहे ती तुझी तुलाच समजते.'

मग देवानें एक गंमत केली.

देव झाला नामा नामा झाला देव। गोणाईचा भाव पहावया ॥ १ ॥
हा घे तुझा नामा काय चाड आम्हां। आनंदाचा प्रेमा गोणाईसी ॥ २ ॥
हातीं धरोनीयां घेऊनी चालली। फिरून पाहती झाली तंव तो देव ॥ ३ ॥
अगा माझ्या बापा तूं कोणा हवासी। मज दुर्बळासी काय होय ॥ ४ ॥
सोळा सहस्र मुख्य अष्ट तुझ्या कांता। त्या माझ्या घाता प्रवर्ततील ॥ ५ ॥
पुंडलीकासी तुवां दिधली आहे भाक। गोणाई म्हणे ठक बहु होसी ॥ ६ ॥

गोणाई काय म्हणाली लक्षांत आलें काय? नामदेवाच्या ठिकाणीं आपल्या-बरोबर देवच येत आहे हें पाहून गोणाई त्याला म्हणते, 'अरे बाबा! तूं कशाला येतोस माझ्याबरोबर? मी जर तुला घेऊन जाऊं लागलें तर तुझ्या सोळा-हजारआठ बायका या सगळ्या मिळून माझा घात करूं पाहतील! तसेंच 'इथून हालणार नाहीं' असें पुंडलीकाला वचन दिलें आहेस ना रे तूं? मग माझ्या-बरोबर कसा येतोस तें वचन मोडून? देवा, तूं तरी मोठा ठकच दिसतोस मला!'

अखेर हा प्रेमकलह संपला आणि—

विठ्ठल म्हणे गोणाई। आपुला नामा घेउनी जाई ॥
हातीं धरूनियां गेली। गोणाई तेव्हां आनंदली ॥

× × ×

श्रीनामदेवांचा बाप दामशेटी याला नामदेवांचा सदोदितचा विठ्ठल—छंद पसंत नव्हता. एकदां रागावून तो नामदेवांना म्हणाला,

'नामदेवा! शिवणें टिपणें करून आपला व्यवसाय चोख चालवावा आणि नेटका संसार करावा हें आपलें कर्तव्य; पण तूं तें सगळें सोडून दिलेंस. गणगोतांत तूं 'चांगलाच' लौकिक कमावलास. माझें सगळें सत्त्व तूं नाहींसें केलेंस. तुला कसली ही भूल पडली आहे तेंच मला कळत नाहीं. त्या विठ्ठलाच्या ठिकाणीं तुला कसलें एवढें सुख लाभलें आहे कीं ज्यामुळें त्याचाच अष्टौप्रहर छंद तुला लागून रहावा? तो देव

आडदांड आणि तूं त्याचा भक्त बेडर ! खरोखरी एकमेकांना तुम्ही साजतां ! तुझ्याविषयीं केवढ्या आशा मीं बाळगल्या होत्या—

सरलें आयुष्य उरले थोडे दिस । थोर केली आस होती जीवीं ॥ १ ॥
आमच्या माघारें राखसी वो नांव । त्वां तंव बरवें दैव काढियेलें ॥ २ ॥
खांदीये भोपळा गळां तुळसीमाळा । जपसी वेळोवेळां रामकृष्ण ॥ ३ ॥
तेणें छंद नयनीं अश्रूंचिया धारा । केली ख्याती गव्हरा जनामाजीं ॥ ४ ॥
अरे ऐसें तुवां बुडविलें कुळ । सांडली सकळ लोकलाज ॥ ५ ॥

दामशेटीनें नामदेवांची निर्भर्त्सना केली, तशीच त्यांची थोडी समजूत केली आणि संसाराकडे थोडें लक्ष देण्यास त्याला विनविलें.

शेवटीं एक दिवशीं नामदेव बाजाराला गेले आणि कांहीं कापडमाल गणोबा नांवाच्या सावकारास देऊन आले. दामशेटीनें या व्यवहाराबाबत नामदेवांना विचारलें तेव्हां ते म्हणाले, 'बाबा, मीं ज्यांच्याशीं व्यवहार केला त्यांचें नांव गणोबा नाईक असें असून त्यांचा पिढीजात सावकारीचा धंदा आहे. त्याच्या दुकानांत मीं कापड विकलें. एका आठवड्यांत ते सर्व रक्कम चुकती करणार आहेत.' हें ऐकून दामशेटीला समाधान झालें. तो म्हणाला, 'ठीक। येत्या आठवड्यांत आपली सगळी रक्कम घेऊन ये.'

आठवड्याच्या बाजाराच्या दिवशीं नामदेव गणोबाकडे गेले आणि आपल्या मालाचे पैसे मागूं लागले. नामदेवांच्या ऐवजाला दुकानांतले धोंडीबा हे जामीनदार होते. त्यांना नामदेव म्हणाले, 'धोंडीबा, आमचे पैसे चुकते करा नाहींतर आमच्या घरीं चला.' असें म्हणून त्यांनीं धोंडीबास ढकलीत आपल्या घरीं आणलें आणि घरच्या एका खोलींत कोंडून ठेवलें. त्यावेळीं गोणाई व दामशेटी हीं दोघें भीमातीरावर स्नानाला गेलीं होतीं. स्नान आटोपून तीं घरीं आलीं तेव्हां नामदेवांची पत्नी राजाई त्यांच्या पायां पडली व सांगूं लागली, 'अहो मामंजी, पहा आपल्या मुलाचा कसा व्यवहार आहे तो ! त्यानें धोंडोबास आणून घरांत कोंडून ठेवला आहे.' दामशेटी म्हणाला, 'नामदेव कुठें गेला आहे ? त्याला बोलवून आणा पाहूं.' नारा व महादा हीं दोन मुलें देवळांत गेलीं आणि त्यांनीं नामदेवांना बोलवून आणलें. त्यांना पाहतांच दामशेटी म्हणाला, 'अरे हें काय केलेंस तूं ? धोंड्याला घरांत कां कोंडलेंस ?'

नामदेव म्हणाला, 'बाबा ! धोंडोबा आपल्या पैशाला जामीन होता. म्हणून मी त्याला घरीं घेऊन आलों.' असें म्हणून खोलीचें दार उघडून नामदेव म्हणाले, 'धोंडोबा ! आमचे पैसे चुकते करा बघूं.' असें म्हणत नामदेवानें धोंडीबाला खोलीबाहेर आणलें. तों काय चमत्कार ! धोंडीबा अंतर्बाह्य सुवर्णमय झालेला होता ! सोन्याचा तो पुतळा पाहतांच दामशेटी खजील झाले व नामदेवाला म्हणाले, 'अरे उगाच मीं तुझा छळ केला !' राजाई गोणाई धांवत आल्या व म्हणाल्या, 'आम्ही कुटुंबवान असूनहि निर्धन म्हणून देवानें ही कृपा केली. नामदेवा ! हा प्रकार कुठें सांगूं मात्र नकोस रे बाबा ! नाहींतर लोकांना हें कळलें तर ते या धोंडीबाला लुटून नेतील.'

नामदेव म्हणाले, 'हें पहा आपलें जेवढें द्रव्य आहे तेवढेंच धोंडोबापासून घ्या आणि बाकीचें गणोबाला पोंचतें करा.'

त्यावर रागावून राजाई म्हणूं लागली, 'देवानें आम्हांला ही देणगी म्हणून दिली ती परत काय म्हणून पाठवायची ? आम्ही गणोबाबिणोबा जाणत नाहीं. मी आतां याचे दागिने करीन.'

इकडे हा वादसंवाद चालू आहे तों ग्रामस्थांना हा लोकविलक्षण प्रकार कळला. ज्यांच्या रानांत धोंडोबा गणोबा होते ते लोक धांवतच नामदेवाच्या घरीं आले. ते नामदेवांना सांगूं लागले, 'हें पहा ! आपल्या मालाचे जे कांहीं रीतसर पैसे असतील तेवढे तुम्ही घ्या. आणि धोंडोबाला आमच्या स्वाधीन करा. यांत जर चुकारपणा कराल तर तुम्हांला चावडी पहावी लागेल.' नामदेव म्हणाले, 'ठीक आहे ! आमच्या मालाचे पैसे द्या आणि धोंडोबाला खुशाल घेऊन जा.'

पुढें काय झालें ?

सकळ समुदाय मिळोनियां आला । द्रव्य देउनी नेला धोंडोबासी ॥ १ ॥
धोंडोबासी सकळिकें ग्रामस्थीं आणिलें । पूर्ववत झालें दगडची ॥ २ ॥
नामा म्हणे विठो पावला निर्वाणी । भक्तां चक्रपाणी रक्षीतसे ॥ ३ ॥

× × ×

श्रीनामदेवांनीं संसारांत थोडें तरी लक्ष्य घालावें म्हणून त्यांची पत्नी राजाई हिनें त्यांचें मन वळविण्याचा खूप यत्न केला. त्यांना ती खूप बोलली—

लावोनी लंगोटी झालेती गोसावी । आमुची ठेवाठेवी कोण करी ॥
घरची कांटिये घातलें हें कैसें । बळेंचि आपणा पिसें लावियेलें ॥
सर्वस्वें सांडोनी धरिला तुम्ही देव । येणें पुसिला ठाव संसारींचा ॥
आमची करुणा न वाटेचि कांहीं । विनविते राजाई नामदेवा ॥

नामदेव आपलें बिलकुल ऐकत नाहींत हें पाहून अखेर राजाईनें आपलें गाऱ्हाणें रखुमाईकडे नेलें—

दोन प्रहर रात्र पाहोनी एकांत । राजाई वृत्तांत सांगे माते ॥
अहो रखुमाईबाई विठोबासी सांगा । भ्रतारासी कां गा वेडें केलें ॥
वस्त्रपात्र नाहीं खाया जेवायासी । नाचे अहर्निशी निर्लज्जसा ॥
चवदा मनुष्यें आहेत माझ्या घरीं । हिंडती दारोदारीं अन्नासाठीं ॥
बरा मार्ग तुम्हां उमजोनी सांगा । नामयाची राजा भली नव्हे ॥

रखुमाईला अशी 'ताकीद' देऊन राजाईनें आपलें गाऱ्हाणें परोपरीनें सांगितलें, आपली दुःस्थिति तिच्याकडे वर्णन केली. अखेर स्वतः पंढरपूरला जाण्यासाठीं म्हणून राजाई आपल्या दोघां मुलांना बरोबर घेऊन निघाली. भिवरा नदींतून जात असतां अकस्मात् नदीला पूर आला. राजाईनें हंबरडा फोडला व ती पंढरीनाथाचा धांवा करूं लागली. त्या पूरांतून विठ्ठलानें तिला तिच्या मुलांसहित सुखरूप बाहेर काढलें. महाद्वारार्शी नामदेव सामोरे आले. राजाई विठोबाला उद्देशून म्हणाली, 'विठ्ठलराया ! कां रे आमची अशी दैना केलीस ? आतां मी माझ्या बाळांसहित विष घेऊन देहत्याग करीन व घर बुडवीन !' असें म्हणून एक मृत सर्प तेथें होता, तो तिनें

घेतला व त्याचे तुकडे तुकडे करून मडक्यांत ते शिजत घातले. नंतर आधण आल्यावर राजाईनें आपल्या मुलांना पोटाशीं धरलें आणि आतां आपण देहनाश करावा असा निश्चय तिनें केला. असा निश्चय ठरवून राजाईनें त्या मडक्यावरचें झांकण काढलें. पाहते तों आंत सापाचे तुकडे नाहींत! त्यांच्याऐवजीं सबंध मडकें कांठोकांठ सोन्यानें भरलेलें आढळलें!

× × ×

एकदां पंढरींत राजाईचे दोघे भाऊ तिला भेटायला आले. भावांना बघून राजाईला अतिशय आनंद झाला. त्यांना बसायला तिनें घोंगडी आंथरली आणि संसाराच्या गोष्टी ती त्यांच्यापाशीं बोलूं लागली. नामदेवांचें संसारांत लक्ष्य नसल्यानें आपली कशी दैना झाली आहे याचें वर्णन तिनें केलें. ही घरची स्थिति ती सांगत असतांना नामदेव घरीं आले. राजाईचे बंधू लगेच उठून उभे राहिले व त्यांनीं नामदेवांना नमस्कार केला. पण नामदेवांनीं त्यांच्याकडे लक्ष्यच दिलें नाहीं. हें पाहतांच राजाईला अतिशय राग आला. ती जळफळत म्हणाली,

अगडधूत येती घेऊनी टाळवीणा। लागे त्यांचे चरणा वेळोवेळीं॥
जन्मामध्यें आले माझे सहोदर। न बोले उत्तर त्यांसी कांहीं॥
भोंदू घरीं येती हरिनामें गर्जती। धुवूनि त्यांचें पिती पायावणी॥
माझे सखे बंधू घरा आले बाई। रामराम तोही न घे त्यांचा॥

पुढें भावांना जेवायला घालण्याचा प्रश्न आला. घरांत तर अन्नाचा कण शिल्लक नाहीं. तेव्हां—

राजाई तें पुसे अहो नामयाला। करा जेवायाला कांहीं यांसी॥
प्रातःकाळीं घरीं सारूनी भोजन। आले ते चालून माझे भेटी॥
नामा म्हणे कांते दशमी एकभुक्ती। भोजन निश्चितीं करूं नये॥
उदईक हरिदिनीं उपवास जागरण। ऐकावें कीर्तन चार प्रहर॥
द्वादशी पारणें झालिया भोजन। ऐकोनी पाहुणे चिंतातुर॥

नामदेव म्हणाले, 'आज दशमी. आज एकदांच भोजन करावें असें शास्त्र आहे. सकाळीं पाहुणे भोजन करून निघाले आहेत. तेव्हां आतां जेवण नको! उद्यां एकादशी–तेव्हां सबंध दिवस उपवास करावा. परवां द्वादशीला जेवण करावें!'

हें नामदेवांचें भाषण ऐकून पाहुणे अत्यंत चिंतातुर झाले. तसेच झोंपले. पण भुकेमुळें ती एक रात्र त्यांना एका वर्षासारखी त्यांना भासली—

क्षुधातुर पोटीं निद्रा नलगे कांहीं। वर्षाएवढी पाहीं रात्र झाली॥

भावांचे हे हाल पाहून राजाईला अतिशय दुःख झालें. पांडुरंगाच्या भक्तीमुळें आपले पति निःसंग झाले, आणि त्यामुळें आपली ही दशा आली या भावनेनें ती विठ्ठलाला दोष देऊं लागली.

इकडे एक माणूस, 'नामदेवांचें घर कोठें आहे?' असें विचारीत विचारीत आला. आल्यावर बाहेर ओटीवर बसलेल्या एकानें आंत जाऊन राजाईस सांगितलें कीं, बरोबर दोन बैल असलेला एक इसम नामदेवांची चौकशी करीत आला

आहे. राजाईनें बाहेर येऊन पाहिलें. तो माणूस म्हणाला, 'अहो बाई! या गोण्या घ्या या नामदेवांच्या आहेत. नामदेव आल्यावर मी पुनः येईन.'

राजाईनें त्याचें नांवगांव विचारलें, त्यावर तो म्हणाला, 'त्यांनीं नांव विचारल्यास केशवशेटी असें नांव सांगा. हें जें गोण्यांतून द्रव्य आहे तें तुम्हीं मुक्त हस्तें खर्च करा. पुनः कांहीं पाहिजे असल्यास अनमान न करतां कळवा. मी त्याचा पुरवठा करीन.' इतकें सांगून केशवशेटी निघून गेले. तोंच नामदेव परत आले. राजाई त्यांना म्हणाली, 'कोणी एक तुमचा जिवलग वाणी इथें येऊन गोण्या टाकून गेला. आपलें नांव केशवशेटी असल्याचें त्यानें सांगितलें.'

नामदेव म्हणाले, 'खास विठ्ठलच येऊन गेला. कशाला तूं आपल्यासाठीं त्याला हे श्रम दिलेस?'

राजाई म्हणाली, 'ही वरईच्या तांदुळांची गोणी आहे.' तेव्हां क्षेत्रस्थ ब्राह्मणांना नामदेवरायांनीं आमंत्रण दिलें. ते आमंत्रण देऊन येण्यापूर्वीं राजाईनें गोणींतून एक घमेलेंभर होन काढून घेतले व गोणी पूर्ववत् शिवून ठेवली. नामदेव ब्राह्मणांना घेऊन आले व त्यांनीं तें गोणींतील सर्व द्रव्य त्यांना वांटून टाकलें. 'ज्याचें द्रव्य त्याला देऊन टाकलें. ऋण कांहींच ठेवलें नाहीं' या आनंदांत नामदेव असतांना राजाई आपण राखून ठेवलेले होन पाहण्यासाठीं गेली. पाहते तों त्या होनांचे कोळसे झालेले तिला दिसले. मनांत ती अत्यंत खजील झाली आणि झालेला सगळा प्रकार तिनें नामदेवांना सांगितला. नामदेव रागावले. ते म्हणाले, 'विठ्ठलाचें तुला दर्शन झालें असतां तुच्छ द्रव्याच्या मोहानें तुझें मन भ्रांत होऊन तूं विठ्ठलचरणांचा त्याग केलास ना!'

राजाईनें हात जोडून नामदेवांची विनवणी केली. राजाई म्हणाली—

मी तंव अज्ञान न कळे तुमचा महिमा।
अपराध क्षमा करा माझा॥
अंतरींची खूण कांहीं सांगा मज।
जें तुम्ही बीज हृदयीं धरुनि असां॥
जेणें सुखें तुमचें चित्त निरंतर।
आनंदें निर्भर सदा असां॥

त्यानंतर राजाईनें आपल्याला झालेल्या क्षणमात्र देवदर्शनाच्या आनंदाचें वर्णन केलें आणि अखेरीस ती म्हणाली,

आतां ये संसारीं मीच धन्य जगीं।
जें तुम्हां अर्धांगी विनटलें॥
परी मला एक वेळ घाला विठोबाचे पायीं।
विनविते राजाई नामदेवा॥

नामदेवरायांच्या चरित्रांत असे सरस व भक्तिरसानें भरलेले अनेक प्रसंग आहेत. मूळ अभंगांतूनच वाचकाला त्यांची खरी गोडी प्रतीत होईल. साधकांनीं नामदेवरायांच्या गाथेचा अभ्यास केला तर तो त्यांना अत्यंत आनंदकर आणि लाभदायक ठरेल.

# श्री साईबाबा संस्थान कमिटीची निवडणूक

श्री साईबाबा संस्थान कमिटीची निवडणूक होऊन ता. २८ नोव्हेंबर १९५४ रोजीं शिरडीस पहिली सभा झाली. त्यांत पदाधिकारी निवडले गेले. विश्वस्त पूर्वीचेच आहेत.

**विश्वस्तः—**

१ श्री. नागेंद्र आत्माराम सावंत (व्यवस्थापक विश्वस्त)
२५, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

२ ,, बाजीराव तात्या कोतेपाटील, जमिनदार,
पोष्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

३ ,, श्रीपाद बाळकृष्ण देव, बी. ए., एलएल. बी.,
५०, नेताजी सुभाष रोड, ठाणा.

४ ,, दत्तात्रय दामोदर रासने, व्यापारी,
नं. ४४२, रविवार पेठ, पुणें नं. २.

५ ,, परशराम कृष्णाजी सावंत, बी. ए., एलएल. बी., एम. एल. ए.,
७६, मरीन ड्राइव्ह, मुंबई १.

**पदाधिकारीः—**

६ डॉ. केशव भगवान गव्हाणकर, एल. सी. पी. एस., (अध्यक्ष)
हिंदमाता लेन, काळाचौकी, मुंबई नं. १२.

७ श्री. दत्तात्रय बळवंत राणे, (सन्मान्य चिटणीस)
१०५ जे, ताराबाग, लव्हलेन, मुंबई नं. १०.

८ ,, कृष्णा जयराम भट, (सं. सन्मान्य चिटणीस)
व्यापारी, सीतासदन, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई नं. २४.

९ ,, रामचंद्र महादेव राणे, (सन्मान्य खजिनदार)
व्यापारी, ९१ के, कोळीवाडी, फणसवाडी, मुंबई नं. २.

१० ,, काशिनाथ शिवराम सावंत, (सं. सन्मान्य खजिनदार)
परशराम बिल्डींग, राममारुती रोड, दादर, मुंबई २८.

**मंडळाचे सभासदः—**

११ श्री. सिताराम गोविंद वाळावलकर, बी. ए. (आनर्स),
२२५ ए, सर भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई १९.

१२ डॉ. गजानन गोविंद दाभोळकर,
साई निवास, ५, सेंट मार्टीन्स रोड, वांद्रा, मुंबई.

१३ श्री. दत्तात्रय भास्कर मालपेकर, सोन्या चांदीचे व्यापारी,
ठाकूरद्वार रोड, जितेकर चाळ, मुंबई २.

१४ ,, चंद्रकांत बालमुकुंद वेलकर, रिटायर्ड प्रेसि. मॅजिस्टेट,
मरीना मॅनशन, चौपाटी, मुंबई ७.

१५ ,, बी. सी. पाटील, बी. ए., एलएल. बी., रिटायर्ड सिव्हिल जज,
'डयूमोर', रिज रोड, मलबारहिल, मुंबई ६.

१६ डॉ. व्ही. के. तोरसकर, एम. बी. बी. एस.,
काळाचौकी पोष्टाजवळ, परेल रोड, मुंबई १२.

१७ श्री. रावसाहेब अनंतराव थोरात, जमीनदार,
१६४ सी, व्हिन्सेंट रोड, दादर, मुंबई १४.

१८ ,, ठमाजी भिकाजी शेळके पाटील, जमीनदार,
पोष्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

१९ ,, के. राधाकृष्णन्, उपाध्यक्ष,
ऑल इंडिया साई समाज, मयलापूर, मद्रास ४.

द. ब. राणे,
सन्मा. चिटणीस,
श्रीसाईबाबा संस्थान कमिटी.





श्रीसमर्थ साईबाबा यांचीं
सुंदर आकर्षणीय रंगित चित्रें
आकार १०×१४. ७×१० आणि २×५
मध्यें मिळूं शकतील. भेटा अगर लिहा:—
मॉडर्न लिथो प्रेस
फॉरबस हॉलजळ विठ्ठलभाई पटेल रोड,
मुंबई ४




## सप्टेंबर १९५४

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं नित्याप्रमाणेंच दररोज भक्तांची रीघ होती. अनेक कलाकारांनीं शिरडीस येऊन श्रींसमोर हजेरी दिली. त्यांतील कांहीं कार्यक्रम पुढीलप्रमाणें:—

**कीर्तन**—ह. भ. प. वसंतशास्त्री पणशीकर, श्रीमती गंगाबाई जहागीरदारीण. भाद्रपद शु० ११ व व० ११ आणि गणेशचतुर्थी या दिवशीं संस्थान-गवई मराठे यांचीं कीर्तनें झालीं.

**पोवाडे**—श्री. रघुनाथराव गुरुजी.

**काव्यगायन**—(श्रीसाईबाबांचे चरित्रावर) श्री. दलिनंद कवि.

**गायन**—श्री. कृष्णराव वेन्हेकर, श्री. विश्वासराव काळे, श्री. राम पेठे, श्री. हरिभाऊ देशपांडे, सौ. लीला वर्तक, श्री. मोहन पै, श्री. महालिंगम् भारत, श्री. विठ्ठलराव शिंदे.

या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत १२०० रुग्णांवर उपचार करण्यांत आले.

## आक्टोबर १९५४

या महिन्यांत नित्याची भक्तजनांची गर्दी होतीच. शिवाय पुण्यतिथि महोत्सवानिमित्त हजारों लोक आले होते. उत्सवाचें वर्णन या अंकांत अन्यत्र दिलेलें आहे.

श्रींसमोर या महिन्यांत झालेले कार्यक्रम—

**कीर्तन**—कु. स्नेहप्रभा द. भालेराव, ह. भ. प. गजानन नाथुजी पोतदार, संस्थान-गवई मराठे.

**गायन**—श्री. ग. प. ओक, कु. मीनाक्षी त्रासी, श्री. डी. एन्. नाडकर्णी, श्री. सूर्यकांत मोहिले, शैला मोहिले, शामराव कोरगांवकर.

**नकला**—श्री. अंबादास फाटक.

**नृत्य**—पार्वतीकुमार नृत्य पार्टी.

**भजन**—श्रीगुरुप्रासादिक भजनी मंडळ.

गुजरातमधील एकरोंअकरा वर्षाचे संत हंसदेव महाराज हे श्रींच्या दर्शनास आले होते.

दिवाळीला लक्ष्मीपूजन श्री. बाजीराव कोते पाटील यांचे हस्तें थाटांत झालें. दिवाळीच्या दिवसांत श्रींच्या विविध स्थानीं उत्तम रोषणाई करण्यांत आली होती.

द्वारकामाईत श्रींच्या बसण्याची शिला ठेवण्याच्या जागीं सिमेंट कॉंक्रीटचें मखर करून त्यांत शिला ठेवण्यांत आली आहे.

कोजागिरीचा समारंभ प्रतिवर्षाप्रमाणें साजरा झाला. त्या दिवशीं श्रींच्या पादुकांना तुलशी–अर्चन–चंद्रपूजा दुधाचा नैवेद्य श्री. कीर्तिकर यांचे हस्तें अर्पण करण्यांत आला,

या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत १००५ रुग्णांवर उपचार झाले.

## नोव्हेंबर १९५४

बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी या महिन्यांत नित्याहून अधिक होती.

श्रींपुढें झालेले कार्यक्रम—

**कीर्तन**—ह. भ. प. दामोदर हरि पेठे, ह. भ. प. विठ्ठलबुवा जुन्नरकर, संस्थान-गवई मराठे यांचीं दोन कीर्तनें.

**गायन**—कांतिलाल पाटणवाला, जगन्नाथ मोहिले, अनिलकुमार मोहिले, विलासिनी कवळे, दत्तोबा केरकर, मेनका शिरोडकर, मारुतराव दोंदे, गणपतराव देवासकर, बाई आझमबाई.

**भजन**—वसंतराव दिवासकर स्वामी.

**वाद्यवादन**—लिंगप्पा देवप्पा बेंगलूर (नाकानें सनईवादन), बाबुराव देवळणकर (सनई).

संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत १४०५ रुग्णांवर औषधोपचार करण्यांत आले.

**—द. ब. राणे**
सन्मान्य चिटणीस

---


## कै. पंडित मोतीलालजींचा दुसऱ्याच्या 'चष्म्यांतून' पहाण्यास नकार

ब्रिटिश अमदानींतील असेंब्लींत स्वराज्य पक्ष ह्या विरोधी पक्षाचे कै. मोतीलालजी पक्षप्रमुख होते. एकदां पंडितजी चष्मा आणण्यास विसरले असतां एका युरोपियन एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरनें आपला चष्मा पुढें केला. हजरजबाबी पंडितजी तत्काळ म्हणाले, "माफ करा, मी आपल्या चष्म्यानें (दृष्टीनें) पाहूं शकत नाहीं."

दुसऱ्याच्या चष्म्यानें (दृष्टीनें) पहाणें सदोष आहे. सबब दूरदृष्टि ठेवून निर्दोष चष्म्यासाठीं भेटा.

**शेंडे आणि कंपनी, चष्म्याचे व्यापारी,** बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.

# श्रीसाई लीला 'त्रैमासिक' मिळण्याचीं ठिकाणें

(१) **श्री. बाबुराव डी. बागवे,**
चीफ एजंट, खटाव बिल्डिंग, गिरगांव नाका, मुंबई ४

(२) **श्री. बोवलेकर,** दादर बी. बी. स्टेशन समोर, मुंबई.

(३) **श्री. सावळाराम खंडू दांगट,** बोरीबंदर, मुंबई.

(४) **श्री. इ. आर. मालपेकर,**
दागिन्यांचें दुकान, जितेकर चाळ, ठाकूरद्वार, मुंबई २.

(५) **श्री भाऊ मोरोबा ढगे,**
टोप्यांचे व्यापारी, ठाकूरद्वार मुंबई २.

(६) **मेसर्स मनोहर बुक डेपो,**
गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परेल, मुंबई १२.

(७) **मेसर्स ठकार आणि कंपनी,**
कोहिनूर सिनेमा समोर, रानडे रोड, दादर, मुंबई २८.

(८) **धी बॉम्बे बुक डेपो,** गिरगांव, मुंबई, ४.

(९) **मेसर्स सारंग बुक डेपो,**
मुनीम हाऊस, चिंचपोकळी, मुंबई १२.

(१०) **मेसर्स दातार आणि पुरोहित,**
वैद्यवाडा, बॉम्बे रोड, ठाणें.

(११) **मेसर्स मंगला वस्तु भांडार,**
अहिल्याबाई चौक, कल्याण.

(१२) **पनवेल न्यूज पेपर स्टॉल,** पनवेल

(१३) **नाडकर्णी आणि कं.** ( स्पोर्टस् ),
**खेळाच्या वस्तूंचे व्यापारी,** धोबीतलाव, मुंबई १.

(१४) **श्री बाबुराव अण्णाराव चौगुले,**
२५२ ठळकवाडी, बेळगांव.

(१५) **न्यू मनोहर बुक डेपो,** गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परळ, मुं. १२.

(१६) **विजयकुमार परफ्यूमरी स्टोअर्स,** कीर्तीकर मार्केट पहिली गल्ली,
दुकान नं. १८, दादर, मुंबई.

बाहेरगांवीं एजंट्स नेमणें आहे, तरी मुंबई ऑफिसच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.



# श्रीसाईलीला

१९५८

र्ष ३२ वें. किरकोळ १० आणे अंक १ ला.

शिरडी संस्थानचे अधिकृत त्रैमासिक

# श्री साई लीला

वर्ष ३३ वें ] ★ [ अंक पहिला

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९५६

संपादक
श्री. नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक
श्री. रामचंद्र महादेव राणे

कार्यालय
ईस्ट अॅण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. ख. स.)

किरकोळ अंक
दहा आणे

## अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखक | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | श्रीसाईवाक्सुधा | | ६ |
| २ | प्रिय वाचक | संपादक | ७ |
| ३ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | ९ |
| ४ | जाऊं चला रे शिर्डी | जानकी बाळकृष्ण तनय | १५ |
| ५ | दत्तावतार श्रीसाईबाबा | अ. य. धोंड | १६ |
| ६ | श्री साईबाबांची शिकवण | | |
| | आत्म्याचें अमरत्व | ना. वा. गुणाजी | २३ |
| ७ | श्यामाची तीर्थयात्रा | डॉ. मायावती गुर्तु | ३६ |
| ८ | सु-श्लोकगीता | वि. के. छत्रे | ४३ |
| ९ | शिरडी–वृत्त | | ४७ |



# श्री साई वाक्सुधा

झालों जरी गतप्राण । वाक्य माझें माना प्रमाण ।
माझीं हाडें तुर्वतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥ १०५ ॥
मी काय पण माझी तुर्वत । राहील तुम्हां सवें बोलत ।
जो तीस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवें ॥ १०६ ॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय २५

# -प्रिय वाचक-

श्रीसाईलीला त्रैमासिकाच्या संपादनाची सेवा गेलीं तीन वर्षें बाबांनीं माझ्याकडून करून घेतली असून, या अंकापासून हें त्रैमासिक ३३ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. श्रीसाईलीला अधिकाधिक वाचनीय व मननीय करण्याचा मी यथाशक्ति प्रयत्न केला आहे. चालू वर्षांतहि लेखक-वाचकांचें साहाय्य आणि बाबांची कृपा यांच्या जोरावर या नियतकालिकाचें संपादन साईभक्तांना प्रिय अशा रीतीनें करण्यांत मला यश येवो हीच बाबांच्या चरणीं एकमेव प्रार्थना.

× × ×

शिरडीला साईदर्शनासाठीं येणाऱ्या भक्तांची संख्या प्रचंड प्रमाणांत दिवसानुदिवस वाढत असल्यामुळें, भक्तांची सोय करण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न संस्थान कमिटीनें चालविला आहे. भक्तांना उतरण्यास सोयीचें व्हावें म्हणून अनेक जागा पूर्वीं बांधलेल्या असून, आतां सुमारें सव्वादोन लाख रुपये खर्चून एक नवीन इमारत बांधण्यांत आली आहे. या इमारतींत शंभरएक खोल्या आहेत व एकाच वेळीं सातआठशें भक्तांना सोयीवार रीतीनें त्यांत राहातां येईल. पोस्ट ऑफिसचीहि सोय शिरडीस येणाऱ्या भक्तांसाठीं करण्यांत आली आहे.

× × ×

नव्या इमारतींत राहूं इच्छिणाऱ्या भक्तांसाठीं माणशीं दोन आणे भाडें घेण्याचा निर्णय कमिटीनें घेतला आहे. भक्तांसाठीं ज्या सोयी उपलब्ध करून देण्यांत येतात त्या पाहतां हें भाडें अत्यल्प आहे असेंच कोणाचेंहि मत पडेल. शिरडीस येणाऱ्या भक्तांना उद्देशून एक अगत्याची सूचना करावीशी वाटते. ती ही कीं या स्थानाचें मांगल्य व पावित्र्य लक्षांत घेऊन सर्वसामान्य स्वच्छता आणि व्यवस्था पाळण्याबाबत भक्तांनीं कटाक्ष ठेवावा. गर्दी झाली तर एकाच खोलींत एकाहून अधिक कुटुंबांना राहाण्यास जागा देणें भाग पडतें. अशा वेळीं आपल्या सोयीवर हें आक्रमण झालें आहे असें न मानतां, भक्तांनीं इतरांची अडचण आणि सर्वांनाच साईदर्शनाची असलेली आस्था लक्षांत घ्यावी आणि खेळीमेळीनें प्रसंगीं थोडी अडचण सोसून परस्पर प्रेमानें राहावें.

× × ×

शिरडीचें स्थान रम्य असल्यामुळें अनेक जण केवळ मौजेची सफर करण्याच्या हेतूनेंहि येथें येतात. बाबांना सर्वच प्रिय आहेत. केवळ मौजेसाठीं देवस्थानीं आलेल्या माणसाच्या वृत्तीत देखील तेथील वातावरणाचा इष्ट परिणाम होतो आणि पुष्कळदां तो देवाधर्माच्या वाटेकडे वळतो. असें असलें तरी हें देवस्थान आहे. एक धार्मिक स्थळ आहे ही भावना मनांत नित्य वागवून, इतरांच्या भावना दुखावणार नाहींत आणि स्वतःची सोय पहातांना इतरांची गैरसोय करण्यास आपण कारणीभूत होणार नाहीं या विषयीं सर्वांनींच दक्षता पाळणें अवश्य आहे, हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. पुष्कळ भक्तांच्या बाबातींत असा अनुभव येतो कीं, शिरडीला आपल्या राहण्याजेवण्याची व इतर

सुखसोयींची व्यवस्था होणें हा जणू आपला हक्क आहे असें त्यांना वाटतें. थोडीशीहि गैरसोय झाली कीं ते लगेच संतप्त होतात आणि कमिटीला नांवें ठेवूं लागतात. साई-दर्शनाला येणाऱ्या भक्तांची जास्तींत जास्त व्यवस्था व्हावी याबद्दलची कसोशी कमिटी-कडून होत आहे. पण या कामीं कमिटीची व्यवस्था कधीं अपुरी पडली तर भक्तांनीं ती गैरसोय मनाला लावून घेऊं नये. थोडेसे कष्ट झाले तरी ते साईचरणीं अर्पण करावे.

× × ×

कांहीं भक्त केव्हां केव्हां सुविचाराला न साजेसा हट्ट धरतात. पुष्कळसे भक्त रात्रीं बेरात्रीं शिरडीस येतात. समाधि मंदिराचे दरवाजे तेव्हां बंद झालेले असतात. मंदिरांतील पूजेअर्चेचें जें सर्वसामान्य वेळापत्रक आहे त्याचा मान ठेवणें हें भक्तांनीं आपलें कर्तव्यच मानलें पाहिजे. पण हें लक्षांत न घेतां अपरात्रीं आलेले हे भक्त मंदिराचे दरवाजे उघडून द्या म्हणून हट्ट धरतात आणि आपल्या इच्छेप्रमाणे घडलें नाहीं म्हणजे रागावतात. अशा अवेळीं आलेल्या पुष्कळ कलाकार भक्तांना आपल्या कलेची श्रीपुढें हजेरी देण्याची इच्छा असते. परंतु अपरात्रीं खास दरवाजे उघडून कलावंतांना श्रीपुढें आपल्या कलेची हजेरी देण्याची सोय करून देणें हें व्यवस्थापकांना शक्य नसतें आणि शिस्तीच्या दृष्टीनें इष्टहि नसतें ही गोष्ट कलावन्त ध्यानीं घेत नाहींत.

भक्तांची सोय व्हावी म्हणून ज्या गोष्टी केल्या आहेत त्यांना देखील आक्षेप घेणारे अनेक भक्त आढळतात. मंदिरांत लघुरुद्रादि धर्मकर्म करून घेण्याची अनेक भक्तांना इच्छा असते. याबाबत कांहींच नियम नसेल तर मंदिरांत कमालीची गर्दी उडेल आणि सगळ्याच भक्तांची गैरसोय होईल. यासाठीं संस्थान कचेरींतून कुपनें देण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळें भक्तांना रांगेनें नंबरवार आपापलीं पूजादि कृत्यें व्यवस्थित करून घेतां येतात. पण या कुपन पद्धतीलाहि कांहींजण नाकें मुरडतातच ! भक्तांनीं एक गोष्ट मुख्यतः ध्यानीं घ्यावी. शिरडींत धर्मपंथनिर्विशेष सर्वांना मुक्तद्वार आहे. कोणाकडूनहि पैशाची अपेक्षा केली जात नाहीं. भक्तांची सोय नीट लागावी एवढ्याच एकमेव मनीषेनें संस्थान कमिटीचें कार्य चालतें. त्यांत अधिकउणें झाल्यास भक्तांनीं तें क्षम्य मानून व्यवस्थापकांशीं सहकार्य करावें आणि बाबांच्या स्थानाला उणेपणा न येईल असें स्वतः वागून इतरांनाहि तसें वागण्यास साहाय्य द्यावें अशी माझी कळकळीची विनंती आहे.

—संपादक


# आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्

## चष्म्यांचे व्यापारी

मुख्य दुकान : २०७, गिरगांव रोड, मुंबई ४

शाखा : [ १ ] चामारबाग रोड, परळ, मुंबई १२.

[ २ ] मुकुंद मॅनशन, न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८

[ ३ ] ९२०-२१ सदाशिव, पुणें २




संकलक:—आमचे प्रतिनिधि

## दोन डॉक्टरांचा अनुभव

**डॉ.** मोहनीराज गणेश काथे आणि डॉ. सौ. कुमुदिनी मोहनीराज काथे, गिरनारे, जि. नासिक, लिहितात :—

आमचा मुलगा चि. विजय वयाच्या दुसऱ्या वर्षापासून दूध सुद्धां घेईनासा झाला. शिवाय लव्वींतून खरही पडे. त्यावर आम्ही घरीं औषधोपचार केले. नाशिक येथील चांगल्या डॉक्टरांचेही इलाज केले. घरीं गुण येईना म्हणून मुंबईच्या नामांकित डॉक्टरांचा सल्ला घेतला. दीड वर्ष मुंबईच्या एका प्रख्यात बालरोग-तज्ञाचेंच इलाज घेऊनही त्यांनींही हात टेकले. तेव्हां देवधर्माचें कांहीं देणें राहिलें असेल असें वाटल्यानें आमचें कुलदैवत श्रीभैरवनाथ, घारी कासारे, येथें जाण्यास निघालों. कोपरगांव स्टेशनवर उतरलों. तेथें शिर्डीस जाणाऱ्या मंडळीची गर्दी दिसली. त्यांचेकडे चौकशी केली तेव्हां शिर्डीस जाऊन मग घारी कासारे येथें जावें असा विचार केला व सुमारें ४ वर्षांपूर्वी प्रथम शिरडीस आलों. त्यापूर्वी श्री. साईबाबांचें नांव आम्ही फारसें ऐकलेंहि नव्हतें किंवा त्यांचे दर्शनास जाण्याचा मनांत विचारहि नव्हता. पण कोपरगांव स्टेशनवर आल्यावर जणूं साईबाबांनी बोलावलें आहे असें वाटलें आणि त्या आज्ञेप्रमाणें शिर्डीस आलों. वेळ दुपारीं १—२ ची होती. ऑफिसमध्यें चौकशी केली.तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं आपण लांबून आलों आहांत, प्रथम प्रसाद ग्रहण करा व मग शांतपणें दर्शन घ्या. त्याप्रमाणें आम्ही प्रसाद (जेवण) घेण्यास बसलों व चि. विजयला सांगितलें कीं, देवाचा प्रसाद आहे, आपल्या हातानें जेव; आणि आमच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं, सांगतां क्षणीच त्यानें आपल्या हातानें जेवायला सुरवात केली. तत्पूर्वी तो कधींच आपले हातानें जेवत नव्हता, किंवा त्याला दुसऱ्यानें भरविलें तरी तें थोडयाच वेळांत ओकून टाकायचा. पण शिर्डीस आल्याचा गुण कीं, त्या दिवसापासून तो थोडेंफार जेवायला लागला. जी गोष्ट अनेक नामांकित डॉक्टरांकडून होऊं शकत नव्हती. ती केवळ शिर्डीत पाय ठेवण्यानें झाली. यामुळें श्रीसाईबाबांच्या दैवी शक्तीचा चमत्कार पाहून मन थक्क झालें. यानंतर आम्ही श्रीसाईबाबांच्या समाधीचें दर्शन घेतलें व ताबडतोब परत जाण्याचा विचार सोडून दोन दिवस येथेंच राहिलों. सुमारें एक वर्षानंतर येऊन श्रीसाईचरणीं सत्यनारायण केला. आनंदाची गोष्ट कीं, त्या दिवसापासून

आमच्या मुलाची उत्तरोत्तर प्रकृतींत चांगली सुधारणा झाली व आतां तो पूर्वींच्या मानानें पुष्कळ सुधारला आहे.

नोकरीधंद्यामुळें श्री साईबाबांचें दर्शन वरचेवर घेण्याचा योग येत नाहीं. पण जेव्हां जेव्हां श्री साईनाथांचें दर्शन घेण्यासाठीं शिरडीस येतों तेव्हां तेव्हां हें पवित्र स्थान सोडून परत जाण्याचें मात्र जिवावर येतें. आम्हांस जसा श्री साईकृपेचा अचानक लाभ मिळाला तसाच इतरांनाहि मिळो हीच त्यांचे चरणीं नम्र प्रार्थना.

× × ×

## विलक्षण फकीर

श्री. दत्तात्रय जयराम राजे, बी. ए. एल्. एल्. बी., वकील, बी. जे. हायस्कूलजवळ, ठाणें, यांचा अनुभव :—

पुढील प्रसंग जून १९५५ मध्यें घडलेला आहे.

श्री. द. ज. राजे यांनीं साईसच्चरिताचा सप्ताह आरंभिला. सात दिवस वाचन झाल्यावर आठव्या दिवशीं गुरुवारीं नियमाप्रमाणें अवतरणिका वाचून संपवून देवाला नैवेद्य दाखवून भोजनास बसण्याचे वेळीं एक फकीर त्यांची चौकशी करीत आला. सच्चरिताचें वाचन आजच संपलें आणि भोजनाला बसण्याचे वेळीं फकीर आलेला पाहून त्याला भोजन देण्याची त्यांना साहजिकपणें इच्छा झाली. पण तो फकीर असल्यामुळें आपल्याकडे बसून भोजन करील कीं नाहीं, आणि तो बसणार तरी कोठें, अशी शंका येऊन त्यांनीं त्या फकिराला तयार असलेले पदार्थ वाढून एक पान तयार करून आणलें आणि तें त्याच्या स्वाधीन करूं लागले. हेतु हा कीं त्यानें तें पान घेऊन कोठेंहि जाऊन भोजन करावें. पण तो फकीर म्हणाला, 'मी तुमच्याकडेच भोजन करण्यासाठीं आलों आहें, तेव्हां मला इथेंच वाढा.' श्री. राजे यांना आनंद झाला. सप्ताहाच्या समाप्तीच्या दिवशीं भोजनाला एक फकीर आलेला आणि बाबाहि फकीरच होते, त्यामुळें त्यांना आनंद वाटत होता. त्यांनीं त्या फकिराला आदरपूर्वक भोजन वाढलें. तथापि नुसत्या भोजनानें फकिराचें समाधान झालें नाहीं. जेवण आटोपल्यावर तो फकीर म्हणाला, 'आनंद झाला. मला पोटभर भोजन दिलेंस, बरें झालें. पण मला तुझ्याकडून दक्षिणा हवी आहे.' फकिराचा हा सवाल ऐकून त्यांना फार वाईट वाटलें. कारण त्यांच्याकडचे रोख पैसे संपून गेले होते आणि फक्त दोन आणे तेवढे त्या दिवशीं शिल्लक राहिले होते. त्यांनीं आपली ती अडचण फकिरास निवेदन करून म्हटलें, 'माझ्याकडे शिल्लक राहिलेले दोन आणे हवे तर मी आपणांस देईन. आज सकाळीं माझा एक पक्षकार यायचा होता. तो आला असता तर त्यानें मला माझी पन्नास रुपये फी दिली असती आणि तसें होतें, तर मी आपणांस त्यांतून दहा रुपये दक्षिणा दिली असती. पण तो सकाळीं आला नसल्यानें माझा नाइलाज झाला आहे." वकिलाचे हे शब्द ऐकून तो फकीर म्हणाला, "अरे, तुझा पक्षकार सकाळीं आला नसलों तरी आज संध्याकाळीं तीन आणि चार वाजण्याच्या दरम्यान येऊन तो तुझे पन्नास रुपये देईल. तेव्हां मी माझ्या दक्षिणेच्या पैशांसाठीं पांच

वाजतां येईन आणि ते घेऊन जाईन." फकिराच्या या बोलण्यावर श्री. राजे यांचा तितकासा विश्वास बसला नाहीं. कारण दुसऱ्या गांवाहून पक्षकार यायचा होता आणि ती त्याची येण्याचा वेळ नव्हती. पण आश्चर्यांची गोष्ट अशी कीं, फकिराच्या भविष्या-प्रमाणें श्री. राजे यांचा पक्षकार सव्वातीन वाजण्याच्या सुमारास आला आणि त्यानें त्यांना पन्नास रुपये दिले. दुपारचा तो फकीर संध्याकाळीं पांच वाजतां दत्त म्हणून येऊन उभा राहिला आणि म्हणाला, "तुझ्या पक्षकारानें तुझे पन्नास रुपये दिले ना ? आतां माझी दक्षिणा टाक !" श्री. राजे यांनीं कबूल केल्याप्रमाणें लगेच दहा रुपये आणून त्या फकिराच्या स्वाधीन केले. फकिरानें पैसे घेतल्यावर आपल्याकडील उदी काढली आणि ती श्री. राजे यांच्या हातीं देण्यासाठीं पुढें केली. तथापि श्री. राजे यांनीं हात पुढें करतांच उदीच्याऐवजीं त्यांच्या हातीं गुलाबाचीं फुलें पडलीं !

× × ×

## बाबांचें नेत्रतेज

**श्री.** अ. स. बाणावलीकर, एम्. ए., एल. एल. बी., ए. टी. ए., मुलतान चिनॉय कम्पौंड, जुहू रोड, मुंबई यांचा अनुभवः—

श्री. बाणावलीकर हें पूर्वी मध्यभारतांत लेबर कमिशनर होते. सध्यां ते भारत-सरकारच्या एअर इंटरनॅशनलमध्यें पर्सनेल ऑफिसर आहेत. श्री. बाणावलीकर यांनीं अर्थशास्त्रावर अनेक इंग्रजी ग्रंथ लिहिले आहेत. श्री. बाणावलीकर हे नास्तिक नसले, तरी दिसेल त्या साधुसंतामागें धांवणारे भोळ्या वृत्तीचेहि नाहींत. त्यांच्या पदवीधर पत्नी सौ. कमलाबाई या शंकरभक्त आहेत. दोघांनींहि साईबाबांचें नांव ऐकलें असलें तरी त्यांची योग्यता काय आहे याचा त्यांनीं कधीं विचार केला नव्हता अगर त्यांच्या-विषयीं बरें अथवा वाईट असें कोणतेंच त्यांचें मत बनलेलें नव्हतें.

कमलाबाई एकदां फार आजारी पडल्या. बराच कालपर्यंत आजाराला उतार पडण्याचीं चिन्हें दिसेनात. तेव्हां कमलाबाईच्या बहिणीनें त्यांच्याकरतां साईसच्चरिताचा सप्ताह आरंभिला. जसजसे सप्ताहाचे दिवस जाऊं लागले, तसतसा कमलाबाईंना थोडा थोडा आराम पडूं लागला. त्याहिपेक्षां विशेष म्हणजे त्यांना त्या वेळपासून आपण बऱ्या होऊं असा आत्मविश्वास वाढूं लागला. त्या आजारांतून साफ बऱ्या झाल्या. त्यामुळें कमलाबाईंना साईबाबांविषयीं आदर वाढूं लागला. त्या आपल्या पतीसमवेत शिर्डीला जाऊन आल्या आणि त्यांच्या देव्हाऱ्यांत शंकराच्या छायाचित्राबरोबर साईबाबांची पूजा होऊं लागली.

पुढें एके दिवशीं एक चमत्कार घडला. श्री. बाणावलीकर यांच्या एका ज्योतिषी मित्रानें एका आगामी संकटाची त्यांना जाणीव दिली आणि तें निवारण होण्यासाठीं अस्सल गुरूचा खडा बसविलेली अंगठी वापरण्यास त्यांना सांगितलें. कमलाबाईंनीं अस्सल पुष्कराज मिळविला व त्याची अंगठी बनवून घेतली. पण ती तशीच बोटांत

घालूं न देतां प्रथम साईबाबांपुढें ठेवावी असें त्यांनीं ठरविलें. त्या अंगठीवर बाबांची कृपादृष्टि पडली कीं तोच त्या अंगठीच्या यशाबद्दलचा आशीर्वाद, अशी त्यांची भावना होती. त्यासाठीं त्यांनीं ती देव्हाऱ्यांत बाबांच्या तसबिरीपुढें ठेवली आणि श्री. बाणावलीकर यांना पूजा करून ती आंगठी बाबांना दाखवून मग बोटांत घालण्यास सांगितलें. श्री. बाणावलीकर पूजेला बसले आणि पूजा करतां करतां चकित झाले. छायाचित्रांतील बाबांच्या नेत्रांतून एक दिव्य किरण आला. अकाशांत वीज चमकावी तशी त्याची दीप्ती होती. श्री. बाणावलीकर गोंधळून गेले. त्यांना काय घडत आहे हेंच कळेना. त्यांनी लगबगीनें पत्नीला हांक मारली. आणि पाहतात तों तो किरण सरळ अंगठीच्या खड्यांत जाऊन विलीन झाला !

श्री. बाणावलीकर विद्वान आणि विवेचक बुद्धीचे असल्यामुळें या चमत्कारावर त्यांचा एकदम कसा विश्वास बसणार ? त्यांनीं तिथेंच बसून विचार केला. पूजेच्या वेळीं निरांजन पेटत होतें. त्याच्या ज्योतीचा प्रकाश बाबांच्या छायाचित्रावर पडून त्याचा प्रतिकिरण अंगठीकडे येऊं शकेल का याची त्यांनीं चिकित्सा केली. पण तसें होणें शक्य नव्हतें. कारण त्यांच्या देव्हाऱ्याची रचना अशी आहे कीं, शंकराचें छायाचित्र उंच स्थळीं आहे आणि बाबांचें छायाचित्र त्याच्या एक फूट खालीं आहे. निरांजन शंकरापुढें होतें. त्याच्या प्रकाशाची ज्योत बाबांच्या छायाचित्रावर जाणें अशक्य होतें. आणि वादाकरतां तें शक्य मानलें तरी बाबांच्या छायाचित्रापासून अंगठीं अर्धाफूट सखल जागीं ठेवलेली होती. त्यामुळें बाबांच्या नेत्रांवर निरांजनाच्या ज्योतीचा किरण जाऊन त्याचा प्रतिकिरण अंगठींत जावयाचा असेल तर अंगठी अधिक उंचावर असती तरच कदाचित् तें शक्य होतें.

दुसरी गोष्ट अशी कीं किरण सरळ दिशेनें जातो. बांक घेत नाहीं. बाणावली-करांच्या समोर घडलेल्या घटनेंतील किरण सरळ दिशेनें अंगठीकडे पोंचत नसल्यानें त्या किरणानें विशिष्ट मर्यादेपर्यंत खालीं आल्यावर वळण घेतलें आणि तो मग सरळ अंगठीच्या खड्यांत शिरला.

'साईबाबा–अवतार व कार्य' या पुस्तकाचे लेखक श्री. अ. य. धोंड यांनीं 'ही आंगठी तुम्हांला यशस्वी ठरली का ?' असा श्री. बाणावलीकरनां जिज्ञासेनें प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले 'आज या अंगठीचें मोल मला लाखाचें आहे. यावरून काय तें समजा.'

× × ×

## दत्तभक्ताचें स्वप्न

श्री. केशव शंकर दीक्षित, २७९ दसरी बिल्डिंग, गिरगांव रोड, मुंबई, यांचा अनुभव :—

श्री. दीक्षित हे लॉइड्स बँकेंत नोकरीला आहेत. ते कांहीं काल अस्थि–क्षयानें (बोन टी. बी.) आजारी होते. सहा महिने त्यांना प्लॅस्टरमध्यें ठेवलें होतें. पुन्हा

त्यांच्या प्रकृतीची तपासणी झाली, पण तपासणीचा रिपोर्ट यावयाचा होता. पुन्हा प्लॅस्टरमध्यें राहावें लागेल असें वैद्यकीय मत ऐकूं येत होतें. श्री. दीक्षित व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उषाबाई चिंतेनें व्यग्र होतीं. अशा मनःस्थितींत श्री. दीक्षित यांना एका रात्रीं स्वप्न पडलें. त्या स्वप्नाचा आशय असा :—

ते फिरायला गेले आहेत. जातां जातां ओढ्यासारखी दिसणारी एक नदी लागली. त्या नदीपलीकडे देऊळ होतें. तें दत्ताचें देऊळ असावें असें त्यांना नदीच्या अलीकडे उभें असतांना वाटत होतें. नदीपलीकडे जाऊन दत्ताच्या पायां पडून येण्याची त्यांना इच्छा झाली. पण ही नदी वाईट आहे, तिला अनपेक्षित पूर येतो, त्यामुळें तुम्ही जातां जातां मध्येंच पुरांत सांपडाल, असें तेथील लोकांनीं त्यांना सांगितलें. पण देवाचें दर्शन घेण्याची इच्छा असल्यामुळें त्यांनीं नदी ओलांडली व ते पलीकडे गेले. पुढें देवळांत जातांच तें दत्ताचें देऊळ नसून देवळांत एका दाढीवाल्या फकिराचें छायाचित्र व समाधि तेवढी होती असें त्यांना आढळून आलें. त्यांनीं त्या छायाचित्राला नमस्कार करतांच एक इसम पुढें आला आणि त्यांच्या कपाळाला भस्म लावून म्हणाला, 'जा तुझें कल्याण होईल, तूं बरा होशील.'

एवढेंच हें स्वप्न होतें. त्यांनीं सकाळीं उठून उषाबाईना स्वप्नाची हकीकत सांगितली आणि म्हटलें, 'हें स्वप्न पाहून मी जागा झालों त्या वेळेपासून मी बरा होणार असा एक प्रकारें दृढ विश्वास वाटूं लागला आहे. पण तें छायाचित्र कोणाचें हें मात्र माझ्या लक्षांत येत नाहीं. असा फकीर मी केव्हां पाहिलेला नाहीं.'

कांहीं दिवसांत त्यांच्या प्रकृतिसंबधांत रिपोर्ट आला. त्यांत 'श्री. दीक्षित यांची प्रकृति सुधारत आहे, प्लास्टरमध्यें ठेवण्याची आवश्यकता नाहीं' असा उल्लेख होता.

श्री. दीक्षित हे दत्तभक्त आहेत. ते आपली नोकरी बरी कीं घर बरें अशा वृत्तिचे असल्यामुळें, त्यांना साईबाबांबद्दल कांहींच माहिती नव्हती. त्यावेळपर्यंत त्यांनीं साईबाबांचें छायाचित्रहि पाहिलें नव्हतें. पण त्यांनीं आपल्या कांहीं मित्रांकडे अशा देवळाची चौकशी केली असतां वर्णनावर तें शिरडीचें समाधिमंदिर असावें. असा मित्रांनीं तर्क केला. पुढें दोनचार दिवस गेले आणि शेजारच्या मुलांनीं खेळतां खेळतां एक छोटेंसें छायाचित्र त्यांच्या खोलींत टाकलें. तें छायाचित्र पाहतांच मात्र श्री. दीक्षित एकदम ओरडले 'हाच तो फकीर! मी स्वप्नांत ज्याचें दर्शन घेतलें तो फकीर हाच!' हा कोण आहे याची चौकशी करण्यास त्यांनीं आपल्या पत्नीला सांगितलें. त्याप्रमाणें चौकशी करतां तें साईबाबांचें चित्र असल्याची खात्री झाली. त्यांना स्वप्नाच्या रात्रीपासून पुष्कळसा आराम वाटत गेल्यामुळें त्यांनीं लगेच नवस केला कीं, मी पूर्ण बरा झाल्यावर एकदां शिरडीस येऊन दर्शन घेईन. श्री. दीक्षित पूर्ण बरे झाल्यावर ते आपल्या पत्नीसह शिरडीस जाऊन आले. श्री. दीक्षित म्हणाले कीं, 'मी जेव्हां शिरडीस गेलों तेव्हां समाधि-मंदिराची रचना माझ्या

स्वप्नांतील देवळाशीं जुळणारी आहे असें दिसून आलें. फक्त नदीपासून देवळाचें अंतर दूर आहे आणि छायाचित्राऐवजीं मंदिरांत मूर्ति आहे.' त्यांना स्वप्नाचा काल विचारतां १९५४ च्या जानेवारी महिन्यांत आपल्याला स्वप्न पडलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यामुळें छायाचित्र आणि मूर्ति याबद्दलची शंका फिटली. कारण त्यावेळीं समाधिमंदिरांत मूर्ति नसून छायाचित्रच होतें. हा खुलासा करतांच त्यांचेंहि या बाबतींत समाधान झालें.

× × ×

## छोट्या मुलीची नवलकथा !

श्री. कमळाकर द्वारकानाथ म्हात्रे, गांवदेवी, मुंबई, यांचा अनुभव :—

म्हात्रे कुटुंब फार पूर्वीपासून साईबाबांची भक्ति करतें. त्यांच्या घरीं साईबाबांचेंच वातावरण असून लहान मुलांच्या तोंडींहि 'बाबा' हे शब्द आहेत. हें म्हात्रे कुटुंब एका उत्सवप्रसंगीं शिर्डीला जाऊन राहिलें होते. साईबाबांच्या समाधि-मंदिराला लागून असलेल्या इमारतींत दुसऱ्या मजल्यावर त्यांना राहावयास जागा मिळाली होती. त्या वेळीं या इमारतीच्या गच्चीचा भाग नादुरुस्त झाला होता. गच्चीला असलेल्या कठड्याचे गज मोडले होते. श्री. कमळाकर म्हात्रे यांची दोन अडीच वर्षांची कन्या या गच्चींत खेळत बसली होती. खालीं समाधिमंदिराला लागून असलेल्या पटां-गणांत बरींच लहान मुलें खेळत होतीं. त्या वेळीं या पटांगणाला फरशी बसविलेली नव्हती. तें अत्यंत ओबडधोबड होतें. खालीं मुलें खेळत असलेलीं पाहून म्हात्रे यांच्या मुलीला आपणहि त्या मुलांत जाऊन खेळावें असें वाटलें. पण ती जाणार कशी ? ती हळूहळू कठड्यापर्यंत आली. कठड्याचे गज गेले होते तेथपर्यंत ती आली आणि दोन मजल्यांवरील त्या गच्चीवरून तोल जाऊन ती खालीं पडली. अनेक लोकांनीं तिला पडतांना पाहिलें आणि ते सगळे अगदीं भिऊन गेले. इतक्या उंचीवरून पडलेली मुलगी जगणें शक्यच नाहीं असें वाटून सर्वजण तिच्याभोंवतीं चटकन् गोळा झाले. पण गोळा झालेल्या सर्व लोकांचे चेहरे व्यथित दिसण्याऐवजीं स्तिमित दिसूं लागले. त्यांना दुःख होण्याऐवजीं आश्चर्य वाटण्या-सारखें असें काय नवल वर्तलें होतें बरें ? होय नवल वर्तलें होतें हेंच खरें ! मुलगी सहज बसल्यासारखी स्वस्थ होती आणि हंसत होती. लोकांनीं तिला कुठें कांहीं लागलें असेल म्हणून उचलून तिचें सर्व अंग तपासून पाहिलें. पण अंगावर कोठें साधा ओरखडाहि नव्हता. कदाचित् कांहीं मुका मार लागला असेल अशा समजुतीनें त्यांनीं तिला शिरडी संस्थानच्या दवाखान्यांत नेलें. पण डॉक्टरांना ही मुलगी दुसऱ्या मजल्यावरून पडली होती हें सांगूनसुद्धां खरें वाटेना. दुसऱ्या मजल्यावरून पडलेल्या त्या मुलीला कुठेंहि लागलें नाहीं किंवा ती रडली नाहीं याचें कारण तिच्याच तोंडून ऐकायला मिळाल्यावर सर्वांच्या आश्चर्यास पारावार राहिला नाहीं. तिला विचारतां ती आपल्या बोबड्या बोलांत म्हणाली, 'मी खालीं खेळायला येत होतें. तेव्हां ते बसले आहेत त्या बाबांनीं मला उचलून खालीं ठेवली !'

× × ×